corrected copy by VC

# मुंबई विदयापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/ २६५

क्र.२/२०२२-२३

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील**

**२१ डिसेंबर २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार, दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी सांयकाळी ४:०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | मां. सदस्याचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डि. टी. शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. कविता लघाटे | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग | सदस्य | उपस्थित |
| ५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ८. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| ९. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

**श्रद्धांजली**

**निवेदिका तबस्सुम**

जेष्ठ अभिनेत्री, निवेदिका तबस्सुम हृदयविकाराच्या आजाराने दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षाच्या होत्या.

**डॉ. मधुसुदन खांबेटे**

लघुउद्योजक संघटना असलेली टिस्रा आणि कोसिआचे संस्थापक डॉ. मधुसुदन खांबेटे त्यांचे दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते.

**विक्रम गोखले**

जेष्ठ अभिनेते - दिग्दर्शक विक्रम गोखले यांचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ७७ वर्षाचे होते.

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**

जेष्ठ साहित्यिक - समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षाचे होते.

**सुलोचना चव्हाण**

लावण्यसम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांचे दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ८९ वर्षाच्या होत्या.

| **बाब क्र.** | **व्यवस्थापन परिषदेची बाब** | **विभाग** |
|---|---|---|
| १ | दिनांक 16 नोव्हेंबर, 2022 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक 16 नोव्हेंबर, 2022 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| २ | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचाऱ्यांसाठी 2023-24 या वर्षामध्ये "वैद्यकीय गट विमा योजना" कार्यान्विय करण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील शिक्षकेत्तर स्थायी कर्मचाऱ्यांसाठी 2023-24 या वर्षामध्ये "वैद्यकीय गट विमा योजना" कार्यान्वित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. | |
| ३ | शासनस्तरावर बिंदूनामावली प्रमाणित नसल्यामुळे पदोन्नती पूर्वीच्या पदाची 7 व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती प्रस्तावास सहसंचालक कार्यालयाने मान्यता दिली असून पदोन्नती नुसार सेवानिवृत्त होताना धारण केलेल्या पदाची सेवानिवृत्त वेतनामधील फरकाचा आर्थिक लाभ विद्यापीठ फंडावर मिळणेबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | पदोन्नती नुसार सेवानिवृत्त होताना धारण केलेल्या पदाची सेवानिवृत्त वेतनामधील फरकाचा आर्थिक लाभ विद्यापीठ फंडावर मिळणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेने मंजूर केला, परंतु सदरचे लाभ भविष्यामधे शासनाकडून मिळाल्यानंतर ते विद्यापीठात वळते (जमा) करण्यात यावे. | |
| ४ | 1) विद्यापीठातील रिक्त असलेली अ) विद्याशाखा अधिष्ठाता ब) संचालक, परीक्षा व मुल्यामापन मंडळ, क) संचालक, नवोपक्रम, नवसंषोधन व साहचर्य मंडळ व ड) संचालक, आजीवन अध्ययन व | मानव संसाधन विकास कक्ष |

| | | |
|---|---|---|
| | जाहिरात मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांत तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीताची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.<br>2) उपरोक्त पदे भरण्याकरीता विहित तरतूदीनुसार निवड समितीवर, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे नामनिर्देषन करण्याकरिता सादर. | |
| ठराव | व्यवस्थापन परिषदने - संचालक, परीक्षा व मुल्यामापन मंडळ, संचालक, नवोपक्रम, नवसंषोधन व साहचर्य मंडळ व संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार ही पदे भरण्याकरीता सदर पदांची जाहिरात मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांत तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता मान्यता नाकारण्यात आली. व्यवस्थापन परिषद पूर्ण गठीत झाल्या नंतर प्रस्ताव सादर करावा असे ठरले. | |
| ५ | स्वंय सिध्दी मित्र संघाचे, स्वंय सिध्दी रात्र महाविद्यालय, सोनादेवी कंपाऊंड, साईबाबा मंदिराजवळ, कल्याण भिवंडी रोड, टेमघर, भिवंडी-421 302 या रात्र महाविद्यालयास दिवस सत्रात वर्ग करण्याबाबत प्रस्तावाचा त्रिसदस्यीय समितीचा अहवाल. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | स्वंय सिध्दी मित्र संघाचे, स्वंय सिध्दी रात्र महाविद्यालय, सोनादेवी कंपाऊंड, साईबाबा मंदिराजवळ, कल्याण भिवंडी रोड, टेमघर, भिवंडी-421 302 या रात्र महाविद्यालयास दिवस सत्रात वर्ग करण्याबाबत त्रिसदस्यीय समितीचा अहवाल स्विकारण्यात आला. | |
| ६ | प्राचार्य, लेट श्री. विष्णू वामन ठाकुर चॅरीटेबल ट्रस्ट, विवा इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च, विवा टेक्निकल कॅम्पस, पोस्ट शिरगाव , विरार (पूर्व), जि. पालघर-401 305 या महाविद्यालयाच्या क्र. 1113/VIVAIMR/2021-22 दिनांक 07 एप्रिल, 2022 रोजीच्या पत्रामध्ये महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | लेट श्री. विष्णू वामन ठाकुर चॅरीटेबल ट्रस्ट, विवा इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च, विवा टेक्निकल कॅम्पस, पोस्ट शिरगाव , विरार (पूर्व), जि. पालघर-401 305 या महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करण्यासाठीच्या प्रस्तावाबाबत व्यवस्थापन परिषदने असा निर्णय दिला कि सेक्शन ११८ व संबंधित समितीने मान्य केलेल्या अटीची पूर्तता करून उपरोक्त प्रस्ताव पुनः व्यवस्थापन परिषदे पुढे सादर करावा. | |
| ७ | महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे, आनंदीबाई रावराणे कला व वाणिज्य महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिंधूदूर्ग या महाविद्यालयाचे पत्र क्र. आराकवाविमवै/संलग्नता/18/2021-22, दिनांक 16 एप्रिल, 2022 रोजी महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे, आनंदीबाई रावराणे कला व वाणिज्य महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिधुदूर्ग च्या ऐवजी महाराणा | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | वाणिज्य महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिधुदूर्ग च्या ऐवजी महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिधूदुर्ग असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | |
| ठराव | महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे, आनंदीबाई रावराणे कला व वाणिज्य महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिधुदूर्ग च्या ऐवजी महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी, जि. सिधूदुर्ग असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाकडे शिफारस करण्याची मान्यता देण्यात आली. | |
| ८ | व्ही.के. क्रिष्णा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स ॲन्ड शरद शंकर दिघे कॉलेज ऑफ सायन्स, भांडूप (प), मुंबई - 400 042 या महाविद्यालयाचे पत्र क्र. VKKMC/UNI/COL.NAMECHANGES/65/2020-21. दिनांक 20 जानेवारी, 2021 नुसार व्ही. के. क्रिशणा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स ॲन्ड शरद शंकर दिघे कॉलेज ऑफ सायन्स, ऐवजी व्ही. के. क्रिष्णा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स ॲन्ड शरद शंकर दिघे कॉलेज ऑफ सायन्स, ॲन्ड पी.ए. मेनन कॉलेज ऑफ मॅनेजमेंट असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | व्ही. के. क्रिशणा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स ॲन्ड शरद शंकर दिघे कॉलेज ऑफ सायन्स, ऐवजी व्ही. के. क्रिष्णा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स ॲन्ड शरद शंकर दिघे कॉलेज ऑफ सायन्स, ॲन्ड पी.ए. मेनन कॉलेज ऑफ मॅनेजमेंट असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाकडे शिफारस करण्याची मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ९ | अध्यक्ष, के. जे. सोमय्या इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड इनफॉरमेषन टेक्नोलॉजी, इव्हेरार्ड नगर, सोमय्या आयुरविहार कॉम्प्लेक्स, सायन, मुंबई - 400 022 या महाविद्यालयाने बी.ई.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष 2020-21 या वर्षापासून बंद करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचा स्थानिक चौकषी समितीचा अहवाल जोडत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | के. जे. सोमय्या इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड इनफॉरमेषन टेक्नोलॉजी, इव्हेरार्ड नगर, सोमय्या आयुरविहार कॉम्प्लेक्स, सायन, मुंबई - 400 022 या महाविद्यालयाने बी.ई.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष 2020-21 या वर्षापासून बंद करण्याबाबतच्या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदने असा ठराव दिला की समितीने | |

| | | |
|---|---|---|
| | निर्देशित केलेल्या अटीच्या अधीन राहून व शासन मान्यतेच्या अधीन राहून बी.ई.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून बंद करता येईल. | |
| बाब क्र. १० | मुंबई विद्यापीठातील विविध विभागातील शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील हंगामी सहायक प्राध्यापकांना मुदतवाढ देणेबाबत... | शैक्षणिक नेमणूक आणि गुणवत्ता हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध विभागातील शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील कार्यरत हंगामी सहायक प्राध्यापकांना ३ दिवसाचा सेवाखंड देऊन दिनांक ४ जानेवारी, २०२३ पासून ३० एप्रिल, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. | |
| बाब क्र. ११ | विद्यापीठातील विविध विभाग/संस्था येथे कार्यरत असलेल्या विनाअनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नतीतील वेतनश्रेणी व वेतनावरील वित्तीय भार विचारार्थ व निर्णयासाठी सादर. | शैक्षणिक नेमणूक आणि गुणवत्ता हमी |
| ठराव | अ ) उपरोक्त प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.<br>ब ) विनाअनुदानित तत्वावर किंवा स्वयंअर्थ साह्य विभाग/ संस्था मधील शिक्षकांना उपरोक्त विषयासंबंधी धोरणात्मक निर्णयासाठी व्यवस्थापन परिषद पूर्ण गठीत झाल्या नंतर निर्णय घेण्यात यावा, असे मान्य करण्यात आले. | |
| बाब क्र. १२ | परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मागणीप्रमाणे पुनर्मुल्यांकन करणे व छायांकित प्रती पुरविणे या सुविधांसाठीचा विनिमयांच्या मसुदा मान्यतेबाबत. | पुनर्मुल्यांकन/छायांकित प्रत कक्ष |
| ठराव | परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मागणीप्रमाणे पुनर्मुल्यांकन करणे व छायांकित प्रती पुरविणे या सुविधांसाठीचा विनिमयांच्या मसुदा दुरुस्ती सह पुनः सादर करण्यास मां. कुलगुरूंनी आदेश दिले. | |
| बाब क्र. १३ | Introduction of new Bachelor & Master courses<br>• M.Sc (Biomedical Instrumentation)<br>• B.Sc (Psychological Health & Behavioural Science) | Garware Inst.Career education & Devlopment |
| ठराव | व्यवस्थापन परिषदने खालील अभ्यासक्रमास मान्यता दिली<br>• M.Sc (Biomedical Instrumentation)<br>• B.Sc (Psychological Health & Behavioural Science) | |
| बाब क्र. १४ | प्राचार्य, गिरीवासी सेवा मंडळ कल्याण संस्थेचे मुरलीधर नानाजी गुरुजी मोहिते कला, वाणिज्य बी.एम.एस. महाविद्यालय खोडाला - जोगलवाडी, ता. मोखाडा जि. पालघर ४०१ ६०४, या महाविद्यालयाचे पत्र क्र. दिनांक,२९ एप्रिल २०२२ रोजी "मुरलीधर नानाजी मोहिते गुरुजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खोडाला - जोगलवाडी"असा | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | गिरीवासी सेवा मंडळ कल्याण संस्थेचे मुरलीधर नानाजी गुरुजी मोहिते कला, वाणिज्य बी.एम.एस. महाविद्यालय खोडाला - जोगलवाडी, ता. मोखाडा जि. पालघर ४०१ ६०४, महाविद्यालयाच्या नावात "मुरलीधर नानाजी मोहिते गुरुजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खोडाला - जोगलवाडी" असा बदल करण्यास व्यवस्थापन परिषदने मान्यता दिली. | |
| बाब क्र. १५ | श्री प्रशांत शंकर मोरे, हंगामी कनिष्ठ टंकलिपिक हे दिनांक ४ जानेवारी, २०२२ पासून कॅंसर या गंभीर आजाराने ग्रस्त असल्यामुळे मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना पुन्हा हंगामी स्वरूपात कामावर रुजू करून घेण्याबाबत विचारार्थ सादर | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | व्यवस्थापन परिषदने असा ठराव केला कि वैद्यकीय दाखल सादर करण्याच्या अटीवर श्री प्रशांत शंकर मोरे, हंगामी कनिष्ठ टंकलिपिक यांना मानवतावादी दृष्टिकोनातून कामावर रुजू करून घ्यावे . | |
| बाब क्र १६ | श्री गणेश अनंत वारिक हंगामी कनिष्ठ टंकलिपिक हे दिनांक १९ मे २०२१ पासून अर्धांगवायू आजाराने ग्रस्त असल्यामुळे मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना पुन्हा हंगामी स्वरूपात कामावर रुजू करून घेण्याबाबत विचारार्थ सादर | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | व्यवस्थापन परिषदने असा ठराव केला कि वैद्यकीय दाखल सादर करण्याच्या अटीवर श्री गणेश अनंत वारिक, हंगामी कनिष्ठ टंकलिपिक यांना मानवतावादी दृष्टिकोनातून कामावर रुजू करून घ्यावे . | |
| बाब क्र १७ | श्री विलास विश्वनाथ ब्रीद , सहायक कुलसचिव (सेवानिवृत्त) यांची दिनांक ०१/०८/२०२१ ते ३१/०८/२०२१ या कालावधीतील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देऊन अनुज्ञेय वेतन अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषद मान्यतेस्तव सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | श्री विलास विश्वनाथ ब्रीद , सहायक कुलसचिव (सेवानिवृत्त) यांची दिनांक ०१/०८/२०२१ ते ३१/०८/२०२१ या कालावधीतील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देऊन अनुज्ञेय वेतन अदा करण्यास व्यवस्थापन परिषदने मान्यता दिली. | |
| बाब क्र १८ | विद्यापीठाच्या विश्ववभूषण डॉ. बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय , आंबडवे , मंडणगड येथील हंगामी कर्मचाऱ्यांना दिनांक १ सप्टेंबर , २०२२ पासून दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ या कालावधीचे वेतन अदा करणेबाबत व त्यांना Minimum Payscale प्रमाणे बेसिक वेतन अदा करण्याची बाब विचारार्थ सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | व्यवस्थापन परिषदने असा ठराव दिला कि विद्यापीठाच्या विश्ववभूषण डॉ. बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय, आंबडवे, मंडणगड येथील हंगामी कर्मचाऱ्यांना दिनांक १ सप्टेंबर , २०२२ पासून दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ या कालावधीचे वेतन देण्यात यावे. व १ डिसेंबर २०२२ पासून मिनिमम स्केल प्रमाणे बेसिक वेतन देण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | मिनिमम स्केल प्रमाणे वेतन देण्यात यावे. | |
| बाब क्र. १९ | Permission issue NOC for additional floor construction in girls wing Diamond AWWA Hostel, Kalina, Mumba. | Infrastructure Planning, Execution and Maintenance Department |
| ठराव | डायमंड आवा (AWWA) हॉस्टेल मध्ये ५ जागा देण्याच्या अटीवर नवीन फ्लोर बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र (NOC) देण्याचा ठराव मान्य करण्यात आला. | |
| बाब क्र. २० | Expression of Interest to donate an amenity Structure at vidyanagari Campus , University of Mumbai | Infrastructure Planning, Execution and Maintenance Department |
| ठराव | दमाणी फौंडेशन फॅमिली ह्यांना मुंबई विद्यपीठातील परिसरात खालील बाबी साठी *व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. | पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याकरीता विविध पर्यायांचा विचारार्थ ठेवण्यासाठी<br>* पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याकरिता विविध पर्यायांचा विचारार्थ ठेवण्यासाठी |

| Sr. No. | Name of Work | Estimated Cost (Cr.) |
|---|---|---|
| 1 | Restoration of Heritage building at Fort Campus | 200.00 |
| 2 | Refurbishment of Old and Dilapidated Strucatures at Kalina | 40.00 |
| 3 | Restoration of Sports Complex Building at Kalina | 5.00 |
| 4 | Complete Digitalization | 15.00 |
| 5 | CCTV for entire Kalina | 2.00 |
| 6 | Rainwater harvesting system in various building in Kalina | 5.00 |
| 7 | Implemented of Solar project in various building in Kalina | 10.00 |
| 8 | Garden development in Kalina | 5.00 |
| 9 | Dedicated complex for meet academic demand of department | 20.00 |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र २१ | दिनांक २१ डिसेम्बर २०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीचे इतिवृत्त मंजूर करणे | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | दिनांक २१ डिसेम्बर २०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेत मान्यता दिली. | |
| २२ | Permission to establish International Level Sports Complex and Students Convention Centre at the land located near MMRDA Bridge, Sport Complex behind Nano Technology Department, University of Mumbai, Vidyanagari Campus, Santacruz (east), Mumbai. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव | सदरचा प्रस्ताव हा सीएसआर च्या माध्यमातून किंवा एक्सटर्नेल फंडिंग एजन्सीच्या माध्यमातून अथवा बीओटी तत्वावर किंवा | |

| | | |
|---|---|---|
| | तश्या प्रकारच्या तत्सम तत्वावर राबविण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. अशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास कायदेशीर बाजू तपासून व्यवस्थापन परिषदे समोर सादर करावा. सदर प्रकल्पाचे स्वरूप लक्षात घेता महाराष्ट्र शासन व मां. राज्यपालांची परवानगी घेणे आवश्यक आहे. | |
| २३ | The matter regarding extend the period of lien for further three years to Dr. Madhura Kulkarni, Deputy Director, Institute of Distance and Open Learning, University of Mumbai | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | असा ठराव मंजूर करण्यात आला कि , डॉ. मधुरा कुलकर्णी यांना तीन वर्षाची लीन (Lien) वाढविण्यास मंजूरी देण्यात यावी. | |
| २४ | डॉ. प्रकाश खांडगे यांची शाहीर अमरशेख अध्यासनावर समन्वयक म्हणून मुदतवाढ देणेबाबत. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | असा ठराव मंजूर करण्यात आला कि , डॉ. प्रकाश खांडगे यांची शाहीर अमरशेख अध्यासनावर समन्वक म्हणून १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. | |
| २५ | डॉ. मोहन कुमार सी. कैमल , सहायक प्राध्यापक पदावर ६० वर्षापर्यंत कार्यरत होते. प्रशासनाच्या मान्यतेनुसार ५८ वर्षापर्यंत सेवानिवृत्ती दिनांकानंतर पुढील दोन वर्षात देण्यात आलेल्या अतिरिक्त वेतनबाबत पुढील निर्णय घेण्याबाबत . | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव मंजूर करण्यात आला कि , डॉ. मोहन कुमार सी. कैमल, सहायक प्राध्यापक पदावर ५८ वर्षापर्यंत सेवानिवृत्ती दिनांकानंतर पुढील दोन वर्ष सदर पदावर काम केले असल्यामुळे अतिरिक्त केलेल्या कामाचे वेतन परत घेऊ नये. | |
| २६ | विनाअनुदानित / कायमविनाअनुदानित महाविद्यालयास महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातिल आरक्षण) अधिनियम, २०२१ च्या अंमलबजावणीबाबत. | विशेष कक्ष |
| ठराव | विनाअनुदानित / कायमविनाअनुदानित महाविद्यालयास महाराष्ट्र शैक्षणिक संस्था मध्ये आरक्षण धोरणाबाबत शासनाकडून मार्गदर्शन घ्यावे तोपर्यंत संवर्गनिहाय आरक्षण धोरण लागू करावे. | |
| २७ | मुंबई विद्यापीठातील एक्सीलरेटर मास स्पेक्ट्रोमीटर केंद्र (एमयुएसी) लॅब येथील डॉ. अभिजीत भोगले, हंगामी संशोधन (सी) यांना एक वर्षाच्या मुदतवाढीबाबत. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील एक्सीलरेटर मास स्पेक्ट्रोमीटर केंद्र | |

| | | |
|---|---|---|
| | (एमयुएसी) लॅब येथील डॉ. अभिजीत भोगले, हंगामी संशोधन (सी) यांना तीन महिने मुदतवाढ देण्यात यावे. सदर पद तात्काळ जाहिरातीने भरण्यात यावे. | |
| २८ | विद्यापीठातील सिंधदुर्ग/ रत्नागिरी /ठाणे / कल्याण उपकेंद्र , आदर्श महाविद्यालय , तळेरे आणि अंबाडे येथील संचालक पदावर कार्यरत असलेल्या प्रभारी संचालक यांना तीन/पाच वर्षाच्या मुदतवाढीबाबत. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | विद्यापीठातील सिंधदुर्ग/ रत्नागिरी /ठाणे / कल्याण उपकेंद्र , आदर्श महाविद्यालय , तळेरे आणि अंबाडे येथील संचालक पदावर कार्यरत असलेल्या प्रभारी संचालक यांना एक वर्षाची मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदने मान्य केला. | |
| २९ | मुंबई विद्यापीठामार्फत महाविद्यालयाच्या संलग्नीकरण व इतर कामासाठी तसेच महाविद्यालयीन शिक्षक विभागामार्फ़त सर्व कामाचे ऑनलाईन पद्धतीने काम करण्यासाठी वर्ष २०१६ साठी खुल्या निवेदेद्वारा निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड नागपूर यांना देण्यात येऊन सदर कंपनी व मुंबई विद्यापीठ यांच्यात २७ सप्टेंबर , २०१६ रोजी सामंजस्य करार (MoU) वर्ष २०१६ ते २०२१ या पाच वर्षासाठी करण्यात आला. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठामार्फत महाविद्यालयाच्या संलग्नीकरण व इतर कामासाठी तसेच महाविद्यालयीन शिक्षक विभागामार्फ़त सर्व कामाचे ऑनलाईन पद्धतीने काम करण्यासाठी निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड नागपूर यांना एक वर्षाची मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदने मान्य केला. व सदर कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करावी, समिती मध्ये संगणक विषयातील एक तज्ञ, इलेक्ट्रोनिक्स विषयातील एक तज्ञ व कुलसचिव यांना घेण्यात यावे असा ठराव व्यवस्थापन परिषदने मान्य केला. | |
| ३० | विद्यापीठातील विविध अनुदानित विभागातील रिक्त असलेली शासन मान्य शिक्षकीय रिक्त पदे भरण्याबाबत. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील एकूण शासनमान्य असलेल्या ३८७ पैके १३६ शिक्षकीय पदे भरण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्या पैकी सहायक प्राध्यापकांची ७० पदे आहेत. सहायक प्राध्यापकांची | |

| | | |
|---|---|---|
| | सर्व पदे प्राधान्याने भरण्यात यावी. दुसऱ्या टप्प्या पदे सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक हि पदे त्या-त्या विभागातील शिक्षकांच्या संख्येवर निश्चित करण्यात यावी. पदांची संख्या निश्चित करण्यासाठी **प्र-कुलगुरू यांचे अध्यक्षेखाली सर्व अधिष्ठाता, कुलसचिव यांची समिती** गठीत करावी. हि पदे त्या-त्या विभागातील शिक्षकांच्या संख्येवर निश्चित करण्यात यावी. व समितीचा अहवाल पुढील सात दिवसात व्यवस्थापन परिषदे समोर सादर करण्यात यावा. समितीचा अहवाल स्वीकारण्याचे सर्व अधिकार मां. कुलगुरूंना देण्यात यावे असे ठरले. | |
| बाब क्र. ३१ | Request to grant permission for the payment of fellowship of Rs 8000/- to Ph.D. Department of Chemistry, University of Mumbai. | Department of Chemistry |
| ठराव | सदरची योजना विस्तृत स्वरूपात १ एप्रिल २०२३ पासून राबविण्यात यावी. सदर योजना अंदाजपत्रकात मध्ये वेगळ्या योजना नमूद करून मां. कुलगुरू समोर सादर करावे असा ठराव व्यवस्थापन परिषदे मध्ये मान्य करण्यात आला. | |
| (आय त्या वेळी आलेली बाब) क्रमांक ३२ | महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांनी पोलीस भरती घेण्याकरिता दिनांक: १५ जानेवारी २०२३ ते ३० मे २०२३ पर्यंत कालिना परिसरातील ग्राउंड ची मागणी केली आहे. आणि सदर भरती हि शासनाची असल्याकारणाने कालिना परिसरातील ग्राउंड हे मोफत किंवा नाममात्र दराने हवे आहे. त्यासंबंधी बाब विचाराधीन. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | उपरोक्त विषयाबाबत क्रीडा विभागाला याबाबत विचारणा केलेली आहे, क्रीडा विभागाने त्यांच्या विभागाचे वर्ग त्या ग्राउंड वर सुरु असल्याने क्रीडा विभागाचे ग्राउंड देण्यास असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे आंबेडकर भवनच्या डाव्याबाजूचे ग्राउंड क्रीडा विभागाचे ग्राउंड सोडून दैनंदिन व आवश्यक बाबी अतिरिक्त सोडून जर जागा उपलब्ध असेल तर विद्यानगरी प्रशासकीय विभागाने नाममात्र दराने देण्यात यावा, तसेच त्याचा कालावधी पण नमूद करावा. असा ठराव व्यवस्थापन परिषदे मधे मान्य करण्यात आला. | |
| (आय त्या वेळी आलेली | कालिना परिसरातील शिक्षक वसाहती मधील रिक्त सदनिका मुंबई विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी यांना देण्याबाबत समिती गठीत करून अहवाल मा. कुलगुरु कडे सादर करण्याची | विद्यानगरी प्रशासन विभाग |

| | | |
|---|---|---|
| बाब) क्रमांक ३३ | बाब मान्यतेसाठी सादर. | |
| | कालिना परिसरातील शिक्षक वसाहती मधील रिक्त सदनिका मुंबई विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी यांना देण्याबाबत खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.<br>१) डॉ. कविता लघाटे,<br>२) प्रा. सुनील भिरूड , व<br>३) प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर.<br>सदर समितीने अहवाल मा. कुलगुरूकडे सादर करावा. समितीचा अहवाल स्वीकारण्याचे सर्व अधिकार मां. कुलगुरूंना देण्यात यावे असे ठरले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

24/12/2011

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मां. कुलगुरू (प्रभारी)